Monday, February 23, 2009

**A helpline will soon be launched for complaints against smoking**

Publication: Prahar, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3



# महापालिका स्थापणार धूम्रपानविरोधी कक्ष!

**मुंबई (प्रतिनिधी) :** सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी करणारा कायदा केंद्र सरकारने संमत केल्यानंतर मुंबई महापालिकेने त्याची गांभीर्याने अंमलबजावणी सुरू केली आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांकडून पालिकेने आजपर्यंत ७८ हजार रुपयांचा दंड वसूल केला असून ती आणखी प्रभावीपणे राबवण्यासाठी धूम्रपानविरोधी कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

त्याबाबत अधिक माहिती देताना आयुक्त डॉ. जयराज फाटक म्हणाले की, हा कक्ष स्थापन करण्याबरोबरच पालिकेतर्फे मोफत हेल्पलाइनही सुरू करण्बात येणार आहे. जेणेकरून 'पॅसिव्ह स्मोकिंग'ला बळी पडणाऱ्यांना आपल्या तक्रारी या दूरध्वनी क्रमांकावर नोंदवता येतील. महापालिकेने या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी केल्याने सार्वजनिक जागी धूम्रपान करणाऱ्यांचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. त्यामुळे असा कक्ष स्थापन करून शहरातील धूम्रपान कमी करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकण्यात आले आहे. या कामी टाटा स्मृती रुग्णालय, हिलीस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ, कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन, व्ही-केअर आणि सलाम बॉम्बे या संस्थाही मदत करणार आहेत. तसेच धूम्रपानविरोधी कायद्याबद्दल जागृती करण्याकरिता ॲक्ट (ॲक्शन कौन्सिल अगेन्स्ट टोबॅको) या संस्थेने www.smokefreemumbai.org नावाचे संकेतस्थळही विकसित केले आहे.

**हिलीस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ संस्थेने एक अहवाल सादर केला असून या अहवालात जवळपास सर्वच मुंबईकरांनी धूम्रपानबंदी करावी, असा कौल दिला आहे.**

| कामाची ठिकाणे-सार्वजनिक जागा धूम्रपानबंदी | धूम्रपानबंदी कायदे कडक असावेत | पॅसिव्ह स्मोकिंग आरोग्याला अपायकारक | सिगारेट ओढणाऱ्यांचा त्रास |
|---|---|---|---|
| ९८ % | ९४ % | ९२ % | ९१ % |

